महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग,
शासन निर्णय क्र. कृकमा ०६१८/ प्र.क्र.१०६/२-स
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : ३० जून, २०१८

वाचा :- १) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक कृकमा ०६१७ / प्र.क्र.१२७/२-स दि. २८.६.२०१७, दि. ८.९.२०१७, दि.७.१२.२०१७, दि.२८.२.२०१८, दि.३१.३.२०१८, दि.१६.४.२०१८ व दि.२.५.२०१८

२) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन शुद्धीपत्र क्रमांक कृकमा ०६१७ / प्र.क्र.१२७/ २-स दि. ५.७.२०१७, दि.२०.७.२०१७ व दि.१२.१२.२०१७

३) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन निर्णय क्रमांक कृकमा ०४१८ / प्र.क्र.५३/२-स दि. ९.५.२०१८ व दि.५.६.२०१८

४) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग शासन परिपत्रक क्रमांक कृकमा ०४१८ / प्र.क्र.५३/ २-स दि. २१.५.२०१८

**प्रस्तावना :-**

राज्यामध्ये सन २००९-१० पासून असलेल्या सततच्या दुष्काळ व नापिकीमुळे कर्जबाजारी झालेल्या शेतक-यांना दिलासा देण्यासाठी दि.२४.६.२०१७ च्या मंत्रीमंडळ बैठकीत मिळालेल्या मान्यतेनुसार शासन निर्णय दि. २८.६.२०१७ अन्वये "छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७" घोषित करण्यात आलेली आहे. तसेच त्यामध्ये संदर्भाधीन शासन निर्णय/ शासन शुध्दीपत्रान्वये वेळोवेळी बदल करण्यात आला आहे.

या योजनेअंतर्गत मुद्दल व व्याजासह रु. १.५ लाखापेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकवेळ समझोता योजना (One Time Settlement) या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांनी त्यांच्या हिश्श्याची संपूर्ण रक्कम दि. ३०.६.२०१८ पर्यंत बँकेत जमा करण्यास मुदत देण्यात आली आहे. सदरची मुदत दि. ३० जून २०१८ रोजी संपुष्टात येत असल्याने त्यामध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

"छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७" या योजनेअंतर्गत मुद्दल व व्याजासह रु. १.५ लाखापेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकवेळ समझोता (One Time Settlement) योजनेखाली पात्र शेतकऱ्यांनी त्यांच्या हिश्श्याची संपूर्ण रक्कम भरण्याचा कालावधी दिनांक १ जुलै २०१८ ते दिनांक ३० सप्टेंबर २०१८ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(रमेश शिंगटे)
अवर सचिव तथा सहनिबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
२) मा. मंत्री, महसूल, मदत व पुर्नवसन, सार्वजनिक बांधकाम यांचे खाजगी सचिव
३) मा. मंत्री, वित्त व नियोजन, वने यांचे खाजगी सचिव
४) मा. मंत्री, सहकार, पणन व वस्त्रोदयोग यांचे खाजगी सचिव
५) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधान परिषद, विधान भवन, मुंबई
६) मा. विधानसभा सदस्य / विधानपरिषद सदस्य (सर्व)
७) मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव
८) मा. अपर मुख्य सचिव (वित्त)
९) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे
१०) मुख्य महाप्रबंधक, भारतीय रिझर्व्ह बँक, केंद्रीय कार्यालय, मुंबई
११) मुख्य महाप्रबंधक, नाबार्ड प्रादेशिक कार्यालय, पुणे
१२) चेअरमन, राज्य स्तरीय बँकर्स समिती , बँक ऑफ महाराष्ट्र,पुणे.
१३) विभागीय आयुक्त, (सर्व)
१४) जिल्हाधिकारी (सर्व)
१५) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
१६) जिल्हा कोषागार अधिकारी, (सर्व)
१७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबई
१८) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (सर्व)
१९) निवडनस्ती